## दिनांक ११ मार्च २०२३ रोजी आयोजित स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठकीचा अहवाल

(स्थळ : पाटकर सभागृह एस. एन. डी . टी . विद्यापीठ चर्चगेट कॅम्पस मुंबई )

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या सुकाणू समितीचे प्रमुख डॉ. करमळकर यांनी समितीच्या कामकाजाविषयी थोडक्यात माहिती दिली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना प्रारूप कसे असावे यासंबंधी सुकाणू समितीमध्ये चर्चा झाली. यामध्ये स्ट्रक्चर , इक्विव्हॅलंस , ग्रेडिंग याबाबत चर्चा झाली. महाराष्ट्रातील १३ विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सेमिस्टर आणि परीक्षा एकत्रित घेतली जाऊ शकेल याबाबत तसेच वर्कलोड बाबत समितीच्या विविध बैठका झाल्या. तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी १२० ते १३२ क्रेडिट्स आणि चार वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी १६० ते १७६ क्रेडिट्स ची मर्यादा निश्चित झाली आहे. मेजर विषयासाठी एकूण क्रेडिट्स पैकी ५० टक्के क्रेडिट्स असले पाहिजेत. स्किल कोर्स, मायनर, व्हॅल्यू ऍडिशन इ. मिळून वर्षाला ४० ते ४४ क्रेडिट्स ची मर्यादा आखलेली आहे. इंटर्नशीप साठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रीज बरोबर महाविद्यालयांना जोडण्याचा विचार चालू आहे.
प्राध्यापकांनी compliance mode मध्ये न जाता विरोधी किंवा ताठर भूमिका न घेता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला सामाजिक मान्यता मिळावी तसेच त्यातील रोजगार क्षमता आणि बहुज्ञानशाखीय स्वरूप यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

यानंतर स्वायत्त महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी / नोडल ऑफिसर्सनी ३-४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रमाचा प्रारूप आराखडा सादर करून त्याच्या अंमलबजावणीतील समस्या व्यक्त केल्या. याबाबत महाराष्ट्राचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी शासनाची भूमिका मांडली. वाढीव आर्थिक तरतुदीबाबत केलेल्या मागणीसाठी त्यांनी स्वायत्त महाविद्यालयांना फंड जनरेशन ला परवानगी देऊ असे मत मांडले. यासाठी CSR फंडातून पैसे उभे करता येतील. माजी विद्यार्थ्यांकडूनही फंड जनरेशन करणे हा एक पर्याय आहे,असेही ते म्हणाले. मुंबई सारख्या ठिकाणी जर नवीन जागा मिळत नसेल तर FSI वाढवून देता येईल का याचा शासन विचार करेल. जगात भारतीय वंशाचे पंतप्रधान होणे, किंवा जागतिक दर्जाच्या कंपनीचे सीओई भारतीय वंशाचे असणे हे भूषणावह आहे. जगाची

अध्यात्मिक भूक भागविण्यासाठी भारतातील माणसांची गरज लागणार आहे. नॅक मूल्यांकनामध्ये स्वायत्त महाविद्यालयांनी २-४ कॉलेजना मदत करावी. महाराष्ट्रातील नॅक मूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. स्वायत्त महाविद्यालयांनी आर्थिक मागण्या कराव्या. अंदाजपत्रकात नसल्या तरी पुरवणी मागण्यातून मंजूर करून घेता येतील.

स्वायत्त महाविद्यालयाच्या सादरीकरणानंतर सुकाणू समिती मधील सदस्यांनी मार्गदर्शन केले.

कौशल्यावर किंवा बहुज्ञानशाखीय आधारित अभ्यासक्रमासाठी विविध संस्थात प्रवेश घेण्यास मुभा देताना काही समस्या येऊ शकतात. प्रवेश , फी ट्रान्सफर किंवा स्कॉलरशिप सारख्या प्रश्नांवर महिनाभरात अहवाल तयार होईल

४० टक्के ऑनलाईन शिक्षणासाठी कोणते अभ्यासक्रम देता येतील, तसेच क्रेडिट स्ट्रक्चर मध्ये त्यांचा समावेश करावा का याबद्दल विचार चालू आहे. ऑनलाईन शिक्षणाचे प्रमाणीकरण करण्यासाठी स्वयम प्रमाणे राज्यात महास्वयम पोर्टल सुरु करण्याविषयी अहवाल तयार होईल. यामध्ये प्रमाणपत्र आणि निवडक अभ्यासक्रमाचे मोड्युल्स तयार करता येतील.

फी बाबत विद्यापीठ स्तरावर प्र-कुलगुरू आणि डीन यांना संपर्क करा.

स्कुल सिस्टीम मध्ये कोणते विषय घ्यायचे त्याविषयी समिती मार्गदर्शन करेल. सध्या अस्तित्वात असलेले ग्रुप स्कुल मध्ये बसवून स्ट्रक्चर तयार करू नये. आर डी कुलकर्णी यांचा अहवाल हा मार्गदर्शक आहे , बंधनकारक नाही. School Specific / Department Specific / Subject Specific या तीन मॉडेल्स मधून कोणतेही किंवा एकाच वेळी वेगवेगळया ज्ञानशाखांना वेगळे मॉडेल निवडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. याबद्दल कार्यगट अहवाल १५ दिवसात येईल. वर्कलोड च्या बाबतीत प्राध्यापकांना संरक्षित करण्याचे पर्याय देऊन त्याचा अहवाल सादर केला जाईल. इंग्लिश विपयात कम्युनिकेशन किंवा अप्लाईड इंग्लिश वर अभ्यासक्रम तयार करून वर्कलोड चा प्रश्न मिटू शकेल. विद्यार्थी आणि पालकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे समजावून सांगितली पाहिजेत.

स्वायत्त महाविद्यालयाच्या समस्या आणि सूचना शिक्षण संचालकांना मेलवर पाठवाव्या.

मुख्य शिक्षण सचिव रस्तोगी यांनी स्वायत्त महाविद्यालयात नवनवीन प्रयोग करण्यावर भर दिला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. Cluster University-Colleges / Unitary Univesity या पर्यायांचा विचार करावा. अनुदानित जागा कायम ठेवून शासनावर कोणताही आर्थिक भार वाढणार नाही या पद्धतीने मान्यता दिली जाईल. याबाबत गॅझेट नोटिफिकेशन लवकरच निघेल. विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने आणि अधिक संधी मिळण्यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत. यासाठी महाविद्यालयाची वेळ वाढवून विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागतील. तुमचा कोर्स तुम्हाला सेल करता आला पाहिजे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी येण्यासाठी काय करावे लागेल याचाही विचार सुरु करावा.

क्रेडिट वर आधारित फी संरचना तयार करून जर एखादे मॉडेल तयार झाले तर शासनाकडे पाठवून द्या.

Outcome Based Learning, Assessment, Evaluation, Skill Development याबाबत काम करून अधिक दर्जेदार शिक्षणक्रम तयार करावे लागतील.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या टास्क फोर्स बरोबर खुली चर्चा अपेक्षित आहे. स्वायत्त महाविद्यालयाचे व्यवस्थापन आणि प्राचार्य यांनी आपल्या समस्या आणि सूचना मांडाव्या. विद्यार्थ्यांना नवीन शिकण्याचा अनुभव मिळेल अशी दृष्टी तयार करा.

---